# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.०७/१०/२०१८

## दि.०७/१०/२०१८ रोजी दु.१२/०० वा.ते २१/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे ३०७ /१८,भादविक ३०२ |
| **फिर्यादी** | विष्णु पवार, वय ३१ वर्षे,रा.विश्रांतवाडी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/१०/२०१८ रोजी सकाळी ०७/०० वा.चे पुर्वी शेलार घाट जवळील मोकळया जागेमध्ये विश्रांतवाडी,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी शेलार घाट जवळील,विश्रांतवाडी,पुणे येथील मोकळया जागेमध्ये कोणीतरी अज्ञात इसमाने,कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन, फिर्यादी यांचा मेव्हणा नामे-अनिल शिवाजी धोत्रे, वय ३७ वर्षे,रा.वडार वस्ती, धानोरी रोड, विश्रांतवाडी,पुणे याचे तोंडावर ठिकठिकाणी कोणत्यातरी धारदार हत्याराने वार करुन, त्याचा खुन केला आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. संगिता पाटील ९०४९९८६२३८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे २५२/१८,भादविक ३०४(अ),२८३,४२७,मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | नामदेव खिलारे, पो.हवा.चंदननगर, पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपी** | आण्णाराव सुभाष गांगणे, वय ३९ वर्षे,रा.कावडेपाठ टोलनाका, दत्त मंदिर लोणीकाळभोर, पुणे मुळ रा. उस्मानाबाद (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०९/२०१८ रोजी रात्रौ ११/५० वा.चे सुमारास मुंढवा खराडी बायपास रोड, एचपी पेट्रोलपंपाजवळ, खराडी,पुणे. |
| **तपशिल** | चंदननगर पो.स्टे.अ.मयत रजि.नं. ११८/२०१८ सीआरपीसी १७४ चे झाले तपासावरुन,यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ट्रक हा रस्त्याचे कडेला उभे असलेल्या टेम्पो ट्रव्हलच्या शेजारी डबल पार्कीग करुन, रोडवर येणारे जाणारे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा पध्दतीने उभा करुन, सदर ट्रकच्या कोणत्याही प्रकारची लाईट न लावता उभा करुन, वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार महिला नामे-सिमरन लखवीरसिंग डिल्लो, वय २६ वर्षे,रा.महाभाग्य सोसायटी, लेन नं.४ साईनाथनगर, वडगाव शेरी,पुणे ही मोपेडसह पाठीमागुन धडकुन तीचे डोक्यास गंभीर जखमी होवुन, दुखापत होवुन, तिचा तिचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एच.व्ही.शिंदे ९०२८३५११६० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगाव पार्क पो स्टे १२७/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | प्रकाश जाधव, वय ४७ वर्षे,रा.घोरपडी गाव,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/१०/२०१८ रोजी सकाळी ०८/४५ वा.चे सुमारास नॉर्थ मेन रोड, लेन नं.बी, श्री गोवर्धन सोसायटी समोर, कोरेगाव पार्क,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे साहेब वय ७५ वर्षे, हे मॉर्निग वॉक करुन, राहते घरी परत येत असताना, नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चैन ४० हजार रुपये किमतीची जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एन.एम.पवार ९८२२७९१६९९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**